# एक बधन असे, जे सर्व बधनातुन मुक्त बनविते

मनुष्याला स्वभावानेच स्वातंत्र्याची सवय आहे. कोणी ही व्यक्ति सामान्यपणे स्वतःला कोणत्याही बंधनात बांधू इच्छित नाही, मग ते बंधन व्यक्तिंचे असो, वस्तुंचे असो वा नियम कायद्यांचे असो. मनुष्यच काय पशु-पक्षी सुध्दा बंधनमुक्त राहु इच्छितात. स्वेच्छेने कोणताही पक्षी पिंजऱ्यात राहू इच्छित नाही आणि ना कोणत्याही जनावराला वाटते कि खुंऔला बांधुन रहावे. कारण कि स्वतंत्रता प्रत्येंक जीवाची मूळ प्रवृत्ति आहे. तरी सुध्दा आजच्या युगात मनुष्याला तऱ्हेतऱ्हेची बंधने आहेत, ज्यामध्ये तो इच्छा असो-नसो पण बांधलेला आहे. पति-पत्नी, माता-पिता, गुरु-शिष्य, स्वामी-सेवक, राजा-प्रजा हे सर्व नात्यांचे बंधन आहेत. प्रत्येक नात्याच्या निहित मर्यादित रुढी-परंपरा , लोक-लाज यांचे बंधन काही कमी नाही. ज्यास इच्छा नसूनही त्याला निभावे लागते. कोणाचे शरीर रुग्ण आहे, दुर्बळ आहे, त्यात काही असमर्थता आहे. अशा प्रकारे तो शरीराच्या बंधनात बांधलेला आहे. तसे सुध्दा प्रत्येक आत्मा जो पर्यंत शरीरात आहे, तो पर्यंत त्याला शरीराच्या कर्मेन्द्रियांच्या बंधनात बांधून रहावे लागते. कोणाचे मन अशांत आणि तनावग्रस्त आहे. शरीर कमकुवत आहे. त्यास मनाचे बंधन आहे आणि सर्वात सूक्ष्म तर विषय विकारांचे बंधन आहे, जे जवळ जवळ प्रत्येक मनुष्याच्या मन आणि शरीर या दोघांना बांधून ठेवते. कधी तो लोभाच्या जाळयात फसतो, तर कधी मोहाच्या दारीने बांधला जातो, तर कधी अहंकारामुळे उंच स्थितिवरुन खाली येतो. कधी आळस आणि उदासीनता त्याच्या क्षमतांना क्षीण करतात. तर कधी ईर्ष्या आणि व्देश त्याची सुख-शांती-चैन छीनून घेतात. विकारांचे हे बंधन दुसऱ्या कोणत्याही मोठया बंधनांहून मोठे आणि कडू आहे. ज्यात अडकून प्रतयेक आत्मा आज तडफडत आहे. म्हणून तर लोक मुक्तिसाठी देवळात जाऊन प्रार्थना करतात कि हे प्रभु! या दुःखांच्या बंधनांपासून लवकर मुक्त कर. परंतु वास्तविक कोणत्याही व्यक्तिला या बंधनांपासून सुटण्याचा उपाय माहितच नाहीये. लोट रट अवश्य लावतात कि हे प्रभु! रक्षण कर, संकट दूर कर सुख-शांति दे. परंतु काय कधी आपण विचार केला कि खरी सुरक्षा कशी होईल आणि आपण बंधन मुक्त कसे बनू ?

रक्षाबंधन वा राखीचे पावन पर्व आपण अनेक पिढयांपासून साजरे करीत आला आहोत. परंतु केवळ भावाने बहिणीची सुरक्षा करण्याचे पर्व मानूनच, लोक हे साजरे करतात आणि विसरुन जाता. ज्ञानाचे सागर परमात्मा शिव वर्तमान कलियूगी सृष्टिच्या अंतकाळी ब्रम्हाबाबांच्या शरीरात येऊन मनुष्य आत्म्यांना विश्व रक्ष्ज्ञणाचा मंत्र देत आहेत. आणि त्याच बरोबर सर्व बंधनांपासुन मुक्त होण्याची युक्ति सुध्दा सांगत आहेत. त्यानुसार राखी पवित्रतेचे एक कडे आहे, जे फक्त एका बहिणी व्दारे आपल्या भावाच्या मनगटावर बांधल्याने विश्व रक्षण होणार नाही. परंतु वास्तविक आज सुरक्षा कडे मानवाला बांधायचे आहे. रक्ष्ज्ञणाच्या सूत्रात विश्व बंधुत्व, मानव प्रेम, शांति, सद्भावना आणि एकतेचा संदेश दडलेला आहे. म्हणून केवळ परंपरागत पध्दतीने राखी चे पर्व साजरे केल्याने काहीच फायदा नाही, जो पर्यंत आपण याचे आध्यात्मिक मर्म समजून आपण सर्व माव जातिची सुरक्षा आणि कल्याणासाठी कार्य करीत नाही, जो पर्यंत प्रत्येक मनुष्य आत्मा विषय विकार व दुर्व्यसनांचा त्याग करीत नाही. पवित्रता आणि प्रेमाच्या सूत्रात बांधवे, म्हणजेजगातील दुःख आणि अडचणींचे सर्व बंधन स्वतः मिटतील वा कमी होतील. सर्वत्र सुख, शांति, आणि खुशाली होईल. अशा प्रकारे रक्षाबंधन एक असे बंधन आहे` सर्व बंधनांपासून मुक्त बनविते.

राजयोग एक सुरक्षा कवच : आपण बघत आहोत कि व्यक्ति विकार आणि व्यसनांच्या बंधनातून इच्छा असूनही सुटू शकत नाहीत, तर या बंधनांनी त्यांचे जीवन दुःखमय बनविले आहे. याचे कारण हेच आहे कि या वाईआपासून होण्यासाठी किंवा त्यांना सोडण्यासाठी व्यक्तिमध्ये आवश्यक इच्छा शक्ति व मनोबल नाहीये. राजयोग अशी ध्यान करण्याची विधि आहे, ज्या व्दारे आपण सर्वशक्तिवान परमात्माशी बुध्दियोग जोडून निज, मन आणि आत्म्याचे सशक्तीकरण करु शकतो. राजयोगाने प्राप्त दिव्य शक्तिच, खरे सुरक्षा कवच आहे जे व्यक्तिला प्रत्येक वाईट आणि विकर्मांपासून वाचविते आणि बंधनांपासून सुटण्याचे बळ प्रदान करते. तर या - राजयोगी आणि पवित्र बनुन राखी पर्व सार्थ करा व सर्व बंधनांपासून मुक्त बना.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com